# परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या सर्वांगीण कार्याचा संक्षिप्त परिचय

## ग्रंथमालिकेचे सामाईक मनोगत !

### १. परात्पर गुरु डॉ. आठवले : अखिल मानवजातीच्या उद्धारासाठी कार्यरत अलौकिक विभूती !

'ज्ञानियांचा राजा । गुरु महाराव ।।', असे वर्णन करता येईल, असे व्यक्तीमत्त्व म्हणजे सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. आठवले ! धर्म, कला, भाषा, राष्ट्ररक्षण, धर्मजागृती आदी विषयांवर विपुल ग्रंथलिखाण करणारे ते 'ज्ञानगुरु' आहेत. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या सोप्या साधनामार्गाची निर्मिती करून साधकांना काळानुसार योग्य साधना शिकवणारे ते 'मोक्षगुरु' आहेत ! अलीकडच्या काळात 'विश्वकल्याणासाठी सत्त्वगुणी लोकांचे 'ईश्वरी राज्य' (हिंदु राष्ट्र, सनातन धर्म राज्य) हवेच', असा सर्वप्रथम उद्घोष करणारे ते 'राष्ट्रगुरु' आहेत. हिंदु समाज, राष्ट्र आणि धर्म यांच्या उत्कर्षाचा दुर्दम्य ध्येयवाद त्यांचे विचार आणि कृती यांत ठायी ठायी आढळतो. यासाठीच अनेक हिंदु धर्मीय, हिंदुत्ववादी, धर्मप्रसारक आणि संत यांना ते 'धर्मगुरु' वाटतात. त्यांच्याकडून देश-विदेशांतील विभिन्न पंथियांना हिंदु धर्माचे महत्त्व आणि साधना यांविषयी अमूल्य मार्गदर्शन लाभत असल्याने ते 'जगद्गुरु' ठरतात. त्यांच्याइतकी सूक्ष्म-जगताच्या संदर्भातील अभ्यास, संशोधन आणि मार्गदर्शन करणारी व्यक्ती आज जगाच्या पाठीवर बहुधा आढळणार नाही. या अर्थी ते 'सूक्ष्म-जगत् संशोधन गुरु' ठरतात ! अशा परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या अलौकिक कार्याचे अनेक पैलू 'परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य' या ग्रंथमालिकेत उलगडून दाखवले आहेत.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे सर्वव्यापी कार्य एका ग्रंथात संकलित करणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे त्यांचे एकेक कार्य आणि त्यासंबंधीची वैशिष्ट्ये सांगणारे ग्रंथ 'परात्पर गुरु डॉक्टरांचे अद्वितीय कार्य' या ग्रंथमालिकेच्या माध्यमातून प्रकाशित करत आहोत.

## २. प्रचलित संतचरित्रांच्या तुलनेत या ग्रंथमालिकेचे महत्त्व

प्रचलित संतचरित्रांमध्ये संतांचे पृथ्वीवर स्थूल स्वरूपातील कार्य वर्णिलेले असते. या ग्रंथमालिकेतही परात्पर गुरु डॉ. आठवले यांची साधना, अध्यात्मप्रसाराचे कार्य, त्यांची शिकवण, त्यांनी देश-विदेशांतील जिज्ञासूंना केलेले मार्गदर्शन इत्यादींचा अंतर्भाव आहेच; पण त्यासह त्यांनी केलेले सूक्ष्मातील कार्यही उलगडून दाखवण्यात आलेले आहे, उदा. त्यांनी दिलेला सूक्ष्मातील लढा, साधकांवर केलेले आध्यात्मिक उपाय, त्यांच्या संकल्पामुळे झालेले कार्य, अस्तित्वामुळे झालेले कार्य. या विवेचनामुळे संतांचे सूक्ष्मातील आध्यात्मिक कार्य कसे असते, हे जिज्ञासूंना कळणे सुलभ होईल. परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे अखिल मानवजातीच्या कल्याणाचे हे स्थूलातील आणि सूक्ष्मातील प्रत्येक कार्य म्हणजे, अध्यात्म शिकणाऱ्यांसाठी एकेक अध्यायच आहे.

## ३. परात्पर गुरु डॉ. आठवले हेच प्रेरणास्रोत अन् मार्गदर्शक !

परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांनी या ग्रंथमालिकेसाठी स्वतः संकलित केलेले लिखाण, संगणकात संग्रही असलेले लिखाण, त्यांच्याकडील छायाचित्रांचा संग्रह आदी ज्ञानभांडार उपलब्ध करून दिले. त्यांनी वेळोवेळी ‘कुठले लिखाण कुठल्या भागात घ्यायचे’, याविषयी मार्गदर्शन केले. कार्याची परिपूर्ण ओळख होण्यासाठी आवश्यक असलेली माहितीही त्यांनी स्वतः वेळोवेळी लिहून दिली. इतकेच नव्हे, तर प्रत्येक ग्रंथाचे लिखाण झाल्यानंतर त्यातील उणिवा वा त्रुटी दाखवल्या, तसेच संकलित झालेले लिखाणही त्यांनी पडताळून दिले. त्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यांमुळेच ही ग्रंथमालिका प्रकाशित करणे शक्य होत आहे.

## ४. ग्रंथमालिका संकलित करतांना येणाऱ्या मर्यादा

परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या ज्ञात कार्याची स्थुलातून दिसणारी भव्यता त्यांच्या सूक्ष्मातील कार्याच्या तुलनेत अत्यल्प आहे. त्यांचे

सूक्ष्मातून चालू असलेले अज्ञात कार्य, विशेषतः सूक्ष्मातील लढा, ज्ञानशक्तीचे कार्य, तसेच त्यांच्या अस्तित्वामुळे होणारे कार्य हे सर्व शब्दातीत असल्याने ते शब्दांत संकलित करण्यास मर्यादा आहेत. या कार्याविषयी ते स्वतःच काय ते सांगू शकतात !

## ५. 'ग्रंथमालिकेचा उद्देश सफल व्हावा', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या नाडीभविष्यात (नाडीपट्ट्यांत) 'परात्पर गुरु डॉ. आठवले हे सध्याच्या कलियुगात श्रीविष्णूचे अवतार आहेत', असे म्हटले आहे ! अशा परात्पर गुरूंच्या मार्गदर्शनानुसार आपण साधना केली, तर आपली आध्यात्मिक प्रगती शीघ्रतेने होईलच, तसेच हिंदु राष्ट्राची स्थापनाही निश्चितच होईल ! सनातनच्या साधकांची होत असलेली शीघ्र आध्यात्मिक प्रगती आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी सर्वत्रचे राष्ट्रप्रेमी, धर्मप्रेमी आणि हिंदुत्ववादी यांचे होत असलेले प्रभावी संघटन, हे याचे प्रमाणच आहे.

'या ग्रंथमालिकेद्वारे परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे माहात्म्य जाणून घेऊन त्यांच्या मार्गदर्शनानुसार साधना करण्याची प्रेरणा जिज्ञासू आणि साधक यांना व्हावी अन् प्रत्येकानेच स्वतःच्या जीवनाचा उद्धार करून घ्यावा', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !'

**– श्री. चेतन धनंजय राजहंस, राष्ट्रीय प्रवक्ते, सनातन संस्था.**

# प्रस्तूत ग्रंथाचे मनोगत

'परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या अलौकिक कार्याची व्याप्ती पहाता 'परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे अद्वितीय कार्य' या ग्रंथमालिकेतील एकेक ग्रंथ सिद्ध व्हायला थोडा विलंब होऊ शकतो; परंतु प्रस्तूत ग्रंथामुळे त्यांच्या सर्वांगीण कार्याची व्याप्ती थोडक्यात लक्षात येईल. एका व्यक्तीकडून अल्पावधीत एवढे सर्वव्यापी कार्य होणे, ही खरे तर अशक्य

कोटीतील गोष्ट आहे. या ग्रंथामुळे परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे असामान्यत्व आणि आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा सर्वमान्य अधिकार लक्षात येईल. या ग्रंथाद्वारे अध्यात्मातील जिज्ञासू आणि अभ्यासक यांना अध्यात्मजगताकडे पहाण्याची एक निराळी दृष्टी लाभेल. विविध संप्रदाय आणि राष्ट्र अन् धर्म यांच्या हितासाठी कार्यरत असणारे यांना त्या त्या क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा आणि दिशा या ग्रंथातून मिळेल. संत, सांप्रदायिक, देशभक्त, धर्मप्रेमी, हिंदुत्ववादी आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे कार्याच्या अनुषंगाने सुसूत्रपणे अन् योजनाबद्ध संघटन होण्यास साहाय्यही होईल, तसेच त्यांना आपापल्या प्रकृतीनुसार ‘साधना’ म्हणून या कार्यात योगदानही देता येईल. अशा प्रकारे धर्माचे पुनरुत्थान आणि हिंदु राष्ट्राची स्थापना या कार्यांना बळकटी येईल.

‘या चरित्रग्रंथाच्या अभ्यासाने अधिकाधिक जणांमध्ये साधनेची स्फूर्ती निर्माण होऊन त्यांनी ईश्वरप्राप्ती करावी’, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !’ – **संकलक**

## सनातनचे जेवढे साधक, तेवढी परात्पर गुरु डॉक्टरांची चरित्रे !

‘परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सनातनच्या प्रत्येक साधकाला सर्वकाही इतके भरभरून दिले आहे आणि साधकांनीही परात्पर गुरु डॉक्टरांना स्थूल अन् सूक्ष्म रूपांत एवढे अनुभवले आहे की, सनातनचा प्रत्येक साधक परात्पर गुरु डॉक्टरांवर न्यूनतम एक ग्रंथ निश्चितच लिहू शकतो. अध्यात्मातील ‘भाव तेथे देव’ या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने आपापल्या भावाप्रमाणे परात्पर गुरु डॉक्टरांना अनुभवले आहे. परात्पर गुरु डॉक्टरांनीही साधकांना त्या त्या रूपात अनुभव देऊन तृप्त केले आहे. ‘व्यक्ती तितक्या प्रकृती, तेवढे साधनामार्ग’, हा अध्यात्मातील सिद्धांत परात्पर गुरु डॉक्टरांच्या चरित्रालाही लागू आहे, असे म्हणता येईल; कारण सनातनचे जेवढे साधक, तेवढी परात्पर गुरु डॉक्टरांची चरित्रे !’ – श्री. रोहित साळुंके, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (२४.१२.२०१४) F (DrCh)

# अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]


१. परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा जन्म आणि त्यांचे आध्यात्मिक प्रवृत्तीचे कुटुंब २१

२. विद्यार्थीदशेत केलेले कार्य २१

३. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनकार्य २३

४. संमोहन-उपचार क्षेत्रातील संशोधनकार्य आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संमोहन-उपचारतज्ज्ञ २३

५. अध्यात्मशास्त्र शिकण्यासाठी केलेले प्रयत्न आणि गुरुप्राप्ती २७

६. अध्यात्मप्रसाराचे कार्य २७

६ अ. 'सनातन भारतीय संस्कृती संस्थे'च्या माध्यमातून केलेले कार्य २८

६ आ. 'सनातन संस्थे'च्या माध्यमातून चालू असलेले कार्य २९

७. साधकांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने केलेले कार्य ३१

* 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती करणे ३१

८. ग्रंथ-निर्मितीचे कार्य आणि प्रकाशनकार्य ३४

९. धर्मशिक्षण देणाऱ्या आणि साधनेविषयी मार्गदर्शन करणाऱ्या ध्वनी-चकत्या आणि ध्वनीचित्र-चकत्या ३८

१०. सनातन पंचांग, संस्कार वही व सनातनची सात्त्विक उत्पादने ३९

११. विविधांगी आध्यात्मिक संशोधन ४०

११ अ. आधुनिक वैज्ञानिक उपकरणे आणि तंत्रज्ञान वापरून केलेले प्रयोग ४०

११ आ. लोलकाच्या संदर्भातील संशोधन ४८

११ इ. वाईट शक्तींच्या संदर्भातील संशोधन ४८

११ ई. आध्यात्मिक उपायांच्या नवनवीन पद्धतींचा शोध ४९

११ उ. विकार-निर्मूलनासाठी उपयुक्त उपायपद्धतींचा शोध ५१

११ ऊ. वाईट शक्तींमुळे झालेल्या त्रासदायक पालटांविषयी, तसेच चांगल्या शक्तींमुळे झालेल्या दैवी पालटांविषयी संशोधन ५३

११ ए. हिंदु धर्मातील आचार, धार्मिक कृती आदींची उपयुक्तता सिद्ध करणारे संशोधन ५४

११ ऐ. प्रार्थना, नामजप, विविध योगमार्ग आदींमुळे होणाऱ्या लाभांविषयी संशोधन ५४

११ ओ. विविध कलांचे सात्त्विक सादरीकरण होण्यासंदर्भात संशोधन ५४

११ ओ १. चित्रकला आणि मूर्तीकला ५४

११ ओ २. अक्षरे आणि अंक यांचे लेखन ५५

११ ओ ३. रांगोळ्या ११ ओ ४. मेंदी ५५

११ ओ ५. संगीत आणि नृत्यकला ५५

११ औ. ज्योतिषशास्त्रातील विविध प्रकारांद्वारे आध्यात्मिक संशोधन ५६

११ अं. प्राणी आणि वनस्पती यांचा सात्त्विकतेच्या दृष्टीने अभ्यास ५७

११ क. दैवी बालके ओळखणे आणि त्यांच्याविषयी संशोधन ५७

११ ख. स्वतःतील (परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्यातील) आणि इतरांच्या संदर्भातील पालटांविषयी संशोधन ५७

११ ग. स्वतःच्या (परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या) महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास ५८

**१२. आध्यात्मिक संग्रहालयासाठी आध्यात्मिक मूल्य असलेल्या वस्तूंचे जतनकार्य** ५९

**१३. सूक्ष्म ज्ञानाच्या संदर्भातील कार्य** ६०

* सूक्ष्मातून कळण्याची क्षमता विकसित करण्याची प्रक्रिया शोधणे ६१
* साधकांना अपौरुषेय असणारे सूक्ष्म ज्ञान मिळवण्यास शिकवणे ६२

**१४. 'आयुर्वेद' या प्राचीन हिंदु आरोग्यशास्त्राचा प्रसार आणि त्यायोगे हिंदु संस्कृतीचे संवर्धन करणे** ६५

**१५. स्वभाषारक्षणाचे कार्य आणि भाषेच्या अलौकिक पैलूंविषयी संशोधन** ६६

**१६. प्रखर हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'च्या माध्यमातून पत्रकारितेचे कार्य** ६७

**१७. 'हिंदु राष्ट्रा'च्या (सनातन धर्म राज्याच्या) स्थापनेचे कार्य** ६९

* लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींच्या निर्मूलनासाठीचे कार्य ७१

**१८. भावी भीषण आपत्काळाच्या दृष्टीकोनातून कार्य** ७४

**१९. परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे सूक्ष्मातील कार्य** ७६

* वाईट शक्तींशी सूक्ष्मातील लढा ७६
* ज्ञानशक्तीद्वारे चालू असलेले कार्य ७७

**२०. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन चालू झालेले कार्य** ८३

२० अ. संघटना ८३

२० अ १. हिंदु जनजागृती समिती ८३

२० अ २. स्पिरिच्युअल सायन्स रिसर्च फाउंडेशन ८६

२० अ ३. हिंदु विधिज्ञ परिषद ८७

२० आ. उपक्रम ८८

२० आ १. सनातन साधक-पुरोहित पाठशाळा ८८

* उद्देश आणि कार्य ८९

२० आ ३. सनातन अध्ययन केंद्र ८९

**२१. ‘महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया’ची स्थापना** ८९

**२२. गुरुकुलांप्रमाणे असलेल्या आश्रमांची निर्मिती** ९१

**२३. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याला गुरु, संत आणि ऋषी यांनी दिलेले आशीर्वाद !** ९५

२३ अ. प.पू. भक्तराज महाराज यांनी दिलेले आशीर्वाद ९५

२३ आ. संतांचे आशीर्वाद (वर्ष १९९६ पासून) ९६

२३ इ. ऋर्षींचे आशीर्वाद (एप्रिल २०१४ पासून) ९६

**२४. प.पू. डॉ. आठवले यांच्या कार्याविषयीचे मान्यवरांचे उद्गार** ९६

**२५. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याविषयी जगद्गुरुपदावरील संतांनी काढलेले गौरवोद्गार !** ९८

**२६. प.पू. डॉ. आठवले यांच्या कार्याविषयी महर्षींचे गौरवोद्गार !** ९९

**२७. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याला ईश्वराने दिलेली आध्यात्मिक प्रमाणपत्रे !** १००

**२८. परात्पर गुरु डॉ. आठवले यांना स्वत:च्या जीवितकार्याविषयी वाटणारी कृतार्थता !** १०१

**२९. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचा गुरुकार्याविषयी असलेला कृतज्ञताभाव !** १०३

**卐 परिशिष्ट १ : परात्पर गुरु डॉ. आठवले स्वत: करत असलेले नित्य आणि नैमित्तिक कार्य** १०५

---

**टीप** ग्रंथातील काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.